ISSN: 2348-1390

# NEW MAN

## INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

VOL. 4 SPECIAL ISSUE AUGUST 2017

A REFEREED AND INDEXED E-JOURNAL

IMPACT FACTOR: 4.321 (IIJIF)

UGC Approved Journal No. 45886

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

Special Issue
On the occasion of National Seminar on

**Women Safety: Challenges and Remedies**

Organized by
Late Ramesh Warpudkar College, Sonpeth and
Shri Panditguru Pardikar College, Sirsala

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**

*Guest Editors*

***Prin. Dr V D Satpute***
*(Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Dist. Parbhani)*

***Prin. Dr. R T Bedre***
*(Shri Panditguru Pardikar Mahavidyalaya, Sirsala Dist. Beed)*

*Associate Editors*

Dr. M G Somwanshi, Dr. S A Tengse, Mr. A K Jadhav
Mr. P T Jondhale, Dr. U Y Mane, Dr. A B Walke

**NEW MAN PUBLICATION**
PARBHANI (MAHARASHTRA)

Contact: +91 9730721393 +91 9420079975 nmpublication@gmail.com

| | |
|---|---|
| **Full Journal Title:** | **NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES** |
| **Editor-in -Chief** | **Dr Kalyan Gangarde** |
| **Editor** | **Dr Sadhana Agrawal** |
| **FREQUENCY:** | **MONTHLY** |
| **Language:** | **ENGLISH, HINDI, MARATHI** |
| **Journal Country/Territory:** | **INDIA** |
| **Publisher:** | **NEW MAN PUBLICATION** |
| **Publisher Address:** | **New Man Publication,Mali Galli, Opp. Maroti Temple, Parbhani - 431401** |
| **Subject Categories:** | **LANGUAGES, LITERATURE, HUMANITIES , SOCIAL SCIENCES & OTHER RELATED SUBJECTS** |
| **Start Year:** | **2014** |
| **Online ISSN:** | **2348-1390** |
| **Impact Factor:** | **4.321 (IIJIF)** |
| **UGC Approved Journal No.** | **45886** |
| **Indexing:** | **Currently the journal is indexed in:**<br>**Directory of Research Journal Indexing (DRJI),**<br>**International Impact Factor Services (IIFS)**<br>**Google Scholar** |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

***DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The editorial board or Editor- in- chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.***

UGC Approved Journal No. 45886
Impact Factor: 4.321 (IIJIF)

53. Important Role Of Education In Women Empowerment / Varma Kirankumari

## SECTION 'C'

54. कामकाजी महिलाओं का यौन-उत्पीड़न / प्रा.डॉ. राम सदाशिव बडे
55. हिंदी उपन्यास में कामकाजी स्त्री की त्रासदी / डॉ. वाहेती कांचनमाला पांडुरंग
56. मीडिया, समाज और नारी छवि / प्रा.डॉ.टेंगसे दिग्विजय माणिकराव
57. महिला सुरक्षा -कानूनी एवंम सामाजिक अधिकार / प्रा.डॉ.गोपाल गांगडे
58. महिला हिंसा एवं कानून /प्रा. पाटील कल्याण शिवाजीराव
59. महिलाओ के प्रती घरेलू हिंसा /डॉ. छाया करकरे
60. मैत्रेयी पुष्पा कृत 'गाना तो बाहर ही है' में नारी समस्या / प्रा. डॉ. रंजिता बलभीम काम्ळे.
61. भारत में महिलाओं की सामाजिक स्थिती एवं सुरक्षा /कुलकर्णी कृष्णकुमार बालासाहेब
62. वैचारिक पृष्ठभूमि और नारी / प्रा.डॉ.कुलकर्णी वनिता बाबुराव
63. महिला सुरक्षा एवं कानुनी अधिकार / डॉ.संतोष बाबुराव कुऱ्हे
64. शंकर पुणतांबेकर के व्यंग्य में व्यक्त नारी चेतना /प्रा. मारोती भारतराव लुटे
65. महिलाओ के अधिकार और कानून / प्रा. पोटकुले हिरा तुकाराम
66. महिला विकास एवं आर्थीक अधिकारों की सुरक्षा / प्रा.डॉ.डी.बी. सांळुंके
67. तसलीमा नसरीन के साहित्य में नारी शोषण के विभिन्न रूप / प्रा. डॉ. शं. रज़िया शहेनाज़ शं. अब्दुला
68. भारतीय समाज की मानसीकता और स्त्री / प्रा.डॉ.वडचकर एस.ए

## SECTION 'D'

69. भारतीय महिलांचे मानव अधिकार व न्यायालयीनआदेशांचाअभ्यास / आकाशे एस.एम.
70. महिला सुरक्षिततेविषयी अस्तीत्वात असलेल्या कायद्याची कार्यक्षमता / प्रा. डॉ. अकोलकर आशा दगडू
71. आधुनिक काळातील महिलांची लैंगिक छेडछाड एक गंभीर समस्या / आळणे अशोक बालाजी , कलखंडे चंद्रशेखर लक्ष्मण
72. महिला विषयीचा पारंपारिक सामाजिक दृष्टीकोन / प्रा. डॉ. शशिकांत मुकुंदराव आलटे
73. भारतीय महिला सुरक्षा विषयक कायदे / प्रा.डॉ.आंधळे बी.व्हि.
74. नोकरी व व्यवसायाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक अत्याचार : विशाखा दिशानिर्देश आणि २०१३ चा कायदा / डॉ.अनुराधा हाणमंतराव पाटील, प्रा.डॉ.उल्का देशमुख
75. कौटुंबिक हिंसाचार कायदा :- २००५ / प्रा. ऑथित्ये बेंजामिन पार्त्से
76. स्त्रीभ्रूणहत्या: कारणे आणि उपाय / डॉ. अमोल काळे , प्रा. जाधव ए. के.
77. कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकार / प्रा. बळीराम पवार
78. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध,मनाई,निवारण) कायदा २०१३ / डॉ.बने रेखा रामनाथ
79. महिलांवर होणाऱ्या हिंसेचा समाजशास्त्रीय अभ्यास / डॉ.सुनंदा भद्रशेटे
80. महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण: जाणीव व जागृती / प्रा.डॉ.डी.के.खोकले, प्रा.डॉ.सुधाकर भालेराव
81. भारतीय महिला सुरक्षाची आव्हाने / डॉ.मांगे चंद्रकांत बन्सीधर
82. भारतातील भाडोत्री किंवा सरोगसी माता / डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे,
83. गृहविज्ञान विषयाची व्याप्ती आणि सुवर्णसंधी / प्रा.सौ.कंरोवाले एम.पी.
84. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण २०१३ चा कायदा व सद्य स्थिती / प्रा.चाटसे अशोक जयाजी
85. उच्च शिक्षणामध्ये महिलांच्या समस्या - एक समाजशास्त्रीय अध्ययन / प्रा.डॉ.चव्हाण एस.जी.
86. कौटुंबिक हिंसाचार : एक समाजशास्त्रीय अभ्यास / प्रा. चव्हाण रामराव धेनू

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta Sonpeth Dist Parbhani

NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES (ISSN: 2348-1390)

UGC Approved Journal No. 45886
Impact Factor 4.321 (IIJIF)

# 73.
# भारतीय महिला सुरक्षा विषयक कायदे

प्रा.डॉ.आंधळे बी.बि.
राज्यशास्त्र विभाग,
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्री जीवनात चढ-उतार आल्याचे दिसून येते. प्राचीन काळात महिलांना आदराचे स्थान होते. येवढेच नाही तर मातृसत्ताक कुटुंब पध्दती अस्तित्वात होती. भारतातील आदिवासी जमातींमध्ये आजही मातृसत्ताक कुटुंब पध्दती आहे. परंतु कालांतराने समाजात पुरुषसत्ताक कुटुंबपध्दती निर्माण झाली. यामुळे समाजात महिलांची पिछेहाट झाली. त्यांना दुय्यम वागवण्यात येऊ लागले. याच काळात महिलांवर धार्मिक, सामाजिक व आर्थिक निर्बंध लादण्यात आले. यामुळे महिलांची सामाजिक स्थिती अधिक दुर्बल झाली. स्त्री ही चुल आणि मुल यापुरतीच मर्यादित करण्यात आली.समाजात स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले. ती अन्यायाची धनी झाली. तीच्यावर अन्याय अत्याचार करण्यात येऊ लागले. तीची सामाजिक सुरक्षितता धोक्यात आली. यातूनच सतीप्रथा, बालविवाह, हुंडापध्दती, देवदासी, स्त्रीभ्रूणहत्या या सारख्या विविध सामाजिक प्रथा व परंपरा निर्माण झाल्या.

भारतीय समाजात महिलांचे आर्थिक सामाजिक, राजकीय स्थान उंचावले पाहिजे. त्यांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार व स्थान मिळाले पाहिजे. यासाठी अनेक स्तरावर प्रयत्न करण्यात आले आहेत. यामुळेच आज विविध क्षेत्रात स्त्रीया आघाडीवर आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय, क्रिडा, उद्योग, संगीत, साहित्य, नाटक, चित्रपट, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नोकरी या सर्वच क्षेत्रात स्त्रीयांचा सहभाग वाढत आहे. हा सर्व बदल विविध कायद्यामुळे झाला आहे. भारतीय घटनाकारांनी राज्य घटनेमध्ये स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा व अधिकार दिले आहेत. भारतीय राज्य घटनेच्या कलम 14 -18 मध्ये समानतेचा अधिकार देण्यात आला आहे. तो सर्वांना समान आहे. तर घटनेच्या कलम 325 नुसार धर्म जात, लिंग, वंश या आधारे स्वतंत्र मतदार संघ निर्माण करता येणार नाहीत. अशी तरतूद करण्यात आली आहे. यामुळे स्त्री-पुरुष समानता येण्यास मदत झाली आहे.

सन 1947 पासून ते आजपर्यंत भारतीय संसदेने महिलांना सुरक्षेसंबंधी अनेक कायदे व प्रयत्न केले आहेत. तसेच भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या महत्वपूर्ण निर्णयांनी सुध्दा महिलांच्या सुरक्षेची काळजी घेतली आहे. याशिवाय 1993 मध्ये 73 वी, व 74 वी घटना दुरुस्ती करुन स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण दिले. जे आज 50 टक्क्यापर्यंत वाढवले आहे. तसेच राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. भारतीय संसदेमध्ये व राज्य विधीमंडळात महिलांचा राजकिय सहभाग वाढावा या उद्देशाने 1999 मध्ये 85 वी घटना दुरुस्ती मांडण्यात आली, यात महिलांना 33 टक्के आरक्षणाची तरतुद आहे. परंतु हे विधेयक अजून पास झालेले नाही.

या शिवाय भारतीय संसदेने महिलांच्या सुरक्षेसंबंधी अनेक कायदे केले आहेत. ते थोडक्यातपुढील प्रमाणे सांगता येतील.

(01) सतीप्रथा बंदी कायदा - 1829
(02) विधवा पुर्नविवाह कायदा - 1856
(03) भारतीय घटस्फोट कायदा - 1869
(04) वैद्यकिय व गर्भपात कायदा - 1929
(05) हुंडा प्रतिबंधक कायदा - 1929
(06) बालविवाह प्रतिबंधक कायदा - 1929
(07) हिंदु विवाह कायदा - 1955
(08) अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा - 1956
(09) हिंदु दत्तक व निर्वाहक कायदा - 1956
10) विवाहित स्त्रीयांचा संपत्ती कायदा - 1959
11) मातृत्व लाभ संबंधीत कायदा - 1961
12) प्रसुति सुधारणा कायदा - 1961

13) समान वेतन कायदा - 1976
14) वेश्याकृती निर्बंध कायदा - 1986
15) हुंडा निषेध कायदा - 1986
16) लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा -
17) मानवी हक्क संरक्षण कायदा - 1993
18) राष्ट्रिय महिला आयोग कायदा - 1990
18) मुस्लिम स्त्री घटस्फोट हक्क संरक्षण कायदा- 1986
19) द्विभार्या प्रतिबंधक कायदा - 1955
20) गर्भ जल परिक्षण विरोधी कायदा - 1958
21) कौटुंबिक छळ संरक्षण कायदा - 2005

यासारखे विविध कायदे करुन यातुन महिलांची सुरक्षा जपण्याचा प्रयत्न केला गेला आहे. भारतीय स्वातंत्र्याला 70 वर्ष पुर्ण होत आहेत. परंतू आजही भारतीय महिला म्हणावी तशी सुरक्षित नाही. यातुन स्त्रीयावरील अन्याय, अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत. बलात्कार, स्त्रीभृण हत्या, हुंडाबळी, बालविवाह, घटस्फोट, स्त्री-पुरुष समानता यांसारख्या समस्या आजही समाजात ..... आहेत. यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अतिसंवेदनशिल बनला आहे. भारतात दर 20 मिनीटाला एका महिलेवर बलात्कार होतो. यावरुन महिला सुरक्षिततेचे गांभीर्य समजून येते. आजही भारतात खैरलांजी, निर्भया, कोपर्डी या सारख्या माणुसकीला काळीमा फासणा-या घटना घडतात. एन.सी.आर.बी.च्या अहवाला नुसार भारतात दर तासाला एक महिला हुंडाबळी होते. भारतात केवळ हिंदु समाजातच नव्हे तर बौध्द, जैन, मुस्लिम, ख्रिश्चन या समाजात सुध्दा स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार होतात. महिलावरील होणारे अन्याय, अत्याचार सर्व समाजापुढे मोठे आव्हान बनुण उभे आहे. स्त्रीयांवर होणारे हे अन्याय अत्याचार थांबवण्यासाठी आणखी कठोर कायदे केले पाहिजेत. तसेच कायद्याची योग्य अंमलबजावणी केली पाहिजे आणि अस्तित्वात असणा-या कायद्यावर आधारित जलद न्याय मिळाला पाहिजे. स्त्रीया आपल्या हक्क अधिकारांबाबत आजही अनभिज्ञ आहेत. यासाठी कायद्याचा प्रचार व प्रसार केला पाहिजे. तसेच स्त्रीयांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे. तरच महिलांची सुरक्षा राखली जाईल. आज महिला अनेक क्षेत्रात प्रगती करीत आहेत. दिल्ली सरकारच्या महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार 80 टक्के महिला आपल्या सुरक्षेविषयी चिंतीत आहेत. शेवटी हेच म्हणता येईल महिलांविषयी आज विविध कायदे करण्यात आले आहेत. विविध विकास योजना सुरु करण्यात आल्या आहेत. पण येवढे करुनच थांबता येणार नाही. एकुण महिलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदलला पाहिजे व कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली तरच महिला सुरक्षा साधली जाईल.

**संदर्भसुची :-**

1. भारतीय राजकारणातील स्त्रीया :- मोहिणी कडुन
2. भारतीय संविधानाची वैचारिक अंतरंग :- आर.डी.साबळे
3. भारतातील देवदासी प्रथा, चळवळ आणि पुर्नवसन :- बळवंत कांबळे
4. भारतीय स्त्री आणि बंधणे :- भावना भार्गवे.
5. दैनिक लोकसत्ता चतुरंग पुरवणी.
6. समाज प्रबोधन पत्रीका.

❑❑❑

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani